सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ पुणे
शिवाजीनगर– पुणे , ४११ ००५
(महाराष्ट्र शासनाचे एकल तंत्रज्ञान विद्यापीठ)

शिष्यवृत्ती विभाग

संपर्क क्र. ०२० २५५० ७०००/०९/५६/५५ Website : www.coeptech.ac.in Email: registrar@coeptech.ac.in

जा.क्र.तंविपु- विद्यापीठ/शिष्यवृत्ती/२०२६ 3795 दि . 31 OCT 2026

परिपत्रक

विषय: शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता OBC, VJNT व SBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल (NSP) आणि महाडीबीटी (Maha DBT) पोर्टलवर शिष्यवृत्ती अर्ज भरण्याबाबत अनिवार्य सूचना.

शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये प्रवेश घेतलेल्या इमाव (OBC), विजाभज (VJNT), आणि विमाप्र (SBC) प्रवर्गातील जे विद्यार्थी शासकीय शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती सवलतीसाठी पात्र आहेत, अशा सर्व विद्यार्थ्यांना याद्वारे कळविण्यात येते की, केंद्र व राज्य शासनाच्या नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता अर्ज प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत.सर्व विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवर आधार कार्डचा वापर करून नवीन Maha ID (Maha IT ID) तयार करणे बंधनकारक आहे.

सर्व संबंधित विद्यार्थी आणि पालकांनी खालील नियमांची, अटींची व वेळापत्रकाची गंभीरतेने नोंद घ्यावी:

खालील नमूद केलेल्या चार विशिष्ट योजनांचे नवीन (Fresh) अर्ज केवळ नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल (NSP) **PM YASASVI Post Matric Scholarship Scheme For OBC EBC And DNT - Maharashtra (Welfare Based Scheme)** या योजनअंतर्गत भरणे बंधनकारक आहे. सदर योजनांसाठी नवीन अर्ज करण्याची सुविधा यावर्षी महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध असणार नाही:या योजनेंसाठी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा ₹ २,५०,०००/- (रुपये २.५ लाख) पर्यंत असणे अनिवार्य आहे त्यापुढील उत्पन्नाचे विद्यार्थी यास पात्र राहणार नाहीत.

- इमाव (OBC) च्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती.
- विमाप्र (SBC) च्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती.
- विजाभज (VJNT) च्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती.
- व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या इतर मागासवर्गीय मुलींसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती.

खालील नमूद राज्यस्तरीय योजनांचे अर्ज पूर्ववत Maha DBT पोर्टलवरच भरावयाचे आहेत:

- व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकणाऱ्या व संलग्न वसतिगृहात राहणाऱ्या VJNT व SBC विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता.
- इमाव (OBC) विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना.
- विमाप्र (SBC) विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना.
- विजाभज (VJNT) विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना.

NSP पोर्टलवर विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत ३०.११.२०२६ आहे, त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत अर्ज भरावेत. शिष्यवृत्तीचा अर्ज मुदतीत अचूक भरणे, आधार लिंक बँक खाते जोडणे आणि कॉलेज स्तरावरून तो अंतिम मंजूर करून घेणे ही संपूर्ण जबाबदारी विद्यार्थ्याची असेल. विद्यार्थ्याच्या निष्काळजीपणामुळे, चुकीची माहिती भरल्यामुळे किंवा मुदतीत अर्ज न केल्यामुळे शासनाकडून महाविद्यालयास शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती (Fee Reimbursement) न मिळाल्यास, संबंधित विद्यार्थ्याला खुल्या प्रवर्गाच्या (Open Category) नियमाप्रमाणे संपूर्ण उर्वरित फी महाविद्यालयात जमा करावी लागेल.

तरी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी वरील वेळापत्रकाची नोंद घेऊन आपले अर्ज NSP / Maha DBT पोर्टलवर भरावेत

Website Link :- NSP: National Scholarship Portal , https://mahadbt2.maharashtra.gov.in/

कुलसचिव

सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ,
पुणे

प्रत : सर्व संचालक, सर्व विभागप्रमुख, संस्थेचे वेबसाइट.